ISSN–2277- 8721
OPEN ACCESS
EIIRJ
ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL
Volume–XI, Issue– III May – June 2022
Original Research Article

# विधवा महिला सक्षमीकरणात महाराष्ट्र राज्याचे योगदान

**प्रा. संतोष देविदास मोहधरे**

*सहाय्यक प्राध्यापक, एस. एस. एन. जे. महाविद्यालय, देवळी, जि. वर्धा-४४२१०१*

*ईमेल आयडी: sdmohadare@gmail.com*

**गोषवारा (Abstract)**

*महाराष्ट्र राज्य हे महिला धोरण तयार करणारे देशातील प्रथम राज्य आहे. महाराष्ट्र राज्याने २५ जानेवारी १९९३ रोजी महिला आयोगाची स्थापना केली. राज्यातील विधवा महिलांची सर्वांगीण स्थिती सुधारण्यासाठी महाराष्ट्र राज्याने 'महिला व बाल विकास' हा स्वतंत्र विभाग जून १९९३ मध्ये स्थापन केला.*

*सर्वसामान्य स्त्रियांना आणि विधवांना आपल्या पसंतीने जीवनमान उंचावण्यासाठी आवश्यक असलेल्या उपलब्ध संधीची व्याप्ती विस्तारित करणे व आरोग्यपूर्ण जीवन जगणे, ज्ञान प्राप्त करणे आणि चांगल्या प्रतीचे राहणीमान उपभोगणे यासारख्या अत्यावश्यक बाबीचा अंतर्भाव महाराष्ट्र राज्याने महिला सक्षमीकरणाचा केला आहे.*

*२०११ च्या जनगणनेनुसार भारतात ११ टक्के कुटुंबाच्या प्रमुख स्त्रिया आहेत. महाराष्ट्र राज्यात तर त्याचे प्रमाण २० टक्के पर्यंत आहे. म्हणजे किमान तीन कोटी कुटुंबासाठी स्त्रीच पालन करती आहे. स्त्री आपल्या उत्पन्नाचा ९० टक्के वाटा कुटुंबासाठी वापरतात हे सर्वेक्षणाने सिद्ध झाले आहे. स्त्रिया फक्त कुटुंबाचे पालनपोषण करीत नसून त्या देशाच्या भांडवलात भर टाकतात. एखादी स्त्री कुटुंबाचे पालन पोषण करते ते तिच्या कुटुंबा पुरते मर्यादित राहत नाही. ती देशाच्या भांडवलामध्ये योगदान देत असते मुलांना जन्म देणे, त्यांचे पालन पोषण करणे, त्यांच्यावर संस्कार करणे, म्हणजेच एका अर्थाने देशाच्या भविष्यासाठी मनुष्यबळाची भांडवली गुंतवणूक करण्याचे काम अविरत करीत असते. त्यामुळेच विकासात स्त्रियांचे दुर्लक्षित झालेले महत्व सर्व स्तरावर याची नोंद घेणे गरजेचे झाले आहे.*

*भारतासारख्या विकसनशील देशाचा विकास आणि महिलांचा विकास यांचा अत्यंत जवळचा व प्रत्यक्ष संबंध आहे. म्हणूनच स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी केंद्र शासन आणि राज्य शासन आवश्यक ते प्रयत्न करीत आहे. महिलांना त्यांचा हक्क व अधिकाराची जाणीव करून देणे आवश्यक आहे. त्याकरिता काही घटनात्मक कायदेही तयार करण्यात आले आहेत. विधवा महिलांना आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी बनविणे व आर्थिक निर्णय प्रक्रियेत सहभागी करण्याच्या उद्दिष्टाने काही प्रमाणात यश प्राप्त झाले आहे. २००५ ते २०१५ या काळात ज्या स्त्रियांचे बँकेत खाते आहे आणि त्या स्वतः वापरतात यांचे प्रमाण सोळा टक्के वरून ५३ टक्के झाले आहे. ही बाब महिला सक्षमीकरणासाठी आवश्यक ठरणार आहे.*

*प्रस्तुत संशोधन लेखातून महाराष्ट्र राज्य शासनाच्या विधवा महिला योजनांचा आढावा घेणे हे प्रमुख उद्देश आहे. हा आढावा २०२०-२१ च्या महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवालातून घेण्यात आला आहे याच निवडक महिला विकास योजनांची प्रगतीचा आढावा घेतला आहे. त्यात प्रामुख्याने शासकीय महिला वसतिगृहे, स्वाधार, उज्वला, मनोधैर्य योजना इत्यादींचा अभ्यास केला आहे. तो पूर्णतः वर्णनात्मक आहे. त्यासाठी दुय्यम आधार सामग्रीचा जसे लेख, संदर्भ ग्रंथ, विविध अहवाल, संकेत स्थळे यांचा संदर्भ घेतला आहे.*

**मुख्य शब्द:** *विधवा महिला सक्षमीकरण, रोजगार, विकास, शासकीय योजना*

ISSN–2277- 8721

EIIRJ

ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

Volume–XI, Issue– III May – June 2022

Original Research Article

**प्रस्तावना**

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताचे उद्दिष्ट हे कल्याणकारी राज्य निर्माण करण्याचे होते. या देशातील सर्व समाजघटकांना विकासाची समान संधी उपलब्ध करून विषमता निर्मूलनाद्वारे सर्वांचे कल्याण साधणे. महिला संदर्भात सुद्धा तो महत्त्वपूर्ण ठरतो. जगाने १९७५ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' म्हणून घोषित केले. ८ मार्च हा दिवस 'जागतिक महिला दिन' म्हणून साजरा केला जातो. याचा प्रमुख हेतू महिला सक्षमीकरण आहे.

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial Use Provided the Original Author and Source Are Credited.

भारतासारख्या पितृसत्ताक व्यवस्थेत स्त्रियांचे स्थान नेहमीच खालच्या दर्जाचे राहिले आहे. त्याचा परिणाम भारताच्या विकासावर झाला आहे. महिला हा घटक विकास प्रक्रियेपासून दूर राहिला आहे. देशाला जो विकासाचा टप्पा गाठायचा आहे त्याकरिता महिलांचा विकासातील सहभाग होणे गरजेचे आहे. याची जाण सर्व स्तरावर झाली आहे. म्हणूनच केंद्र व राज्य सरकारे महिला सक्षमीकरणास एकमत होऊन उपाययोजना करीत आहे.

भारतीय स्त्रियांवर वर्षानुवर्षे पुरुषी आधाराने जगण्याची सवय व संस्कार झाले आहेत. त्यामुळे स्वतःवरचा विश्वास गमावून बसली आहे. त्यांच्या जीवनात पुरुष नसला की, ती स्वतःला असुरक्षित समजते. बालपणी वडिलांचा, वडील भावाचा नंतर पतीचा आधार घेऊन जगणारी स्त्री पती गेल्यानंतर स्वतःला निराधार समजायला लागते व अत्याचाराला बळी पडते. ही स्थिती जवळपास शिक्षित व अशिक्षित स्त्रियांमध्ये सारखे बनाने दिसून येते. याकरिता समाजाचा दृष्टिकोन परिवर्तन होण्याची वाट न बघता स्त्रियांनी स्वतः मध्ये परिवर्तन घडवून आणण्याची गरज निर्माण झाली आहे. शासन फक्त स्त्रियांचे अधिकार, संरक्षणात्मक कायदे करू शकतात परंतु त्याचा वापर व स्वतःचे रक्षण तिला स्वतःलाच करावे लागेल. म्हणूनच लोकसंख्या शास्त्रज्ञांनी हे स्पष्ट केले आहे की, स्त्रियांचे शिक्षण महत्त्वाचे आहे परंतू नुसतं शिक्षण किंवा पैसा कमावण्याची क्षमता या गोष्टी आपल्या पुरुषप्रधान समाजात पुरेशा नाहीत.

**१. भारतातील निवडक राज्यातील महिलाविषयक निर्देशक माहिती**

भारतातील काही निवडक राज्यातील महिला विषयक आकडेवारी लक्ष वेधून घेत आहे. भारतीय संस्कृती ही पुरुषप्रधान मानली जाते. अपघाताने अवेळी झालेल्या कुटुंब प्रमुखाच्या मृत्यूनंतर कुटुंबाची जबाबदारी विधवा स्त्रीवर येत असते.

आधार :गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र शासन भारतात महाराष्ट्र आंध्र प्रदेश,उत्तर प्रदेश, व तामिळनाडू ही राज्य लोकसंख्येने व भौगोलिक दृष्ट्या महत्त्वपूर्ण आहेत. या राज्यातील महिला कुटुंबप्रमुख यांचे संख्या इतर राज्याच्या तुलनेत जास्त आहेत. प्रामुख्याने त्यात आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या उत्तर प्रदेशात जास्त आढळून येते. याच राज्यात महिलांवरील अत्याचारांची संख्या जास्त आहे. ज्या राज्यात निराधार किंवा विधवा महिलांची संख्या जास्त आहे त्या राज्यात महिला अत्याचाराचे प्रमाण जास्त दिसतात. त्यामुळेच विधवा निराधार महिलांना सामाजिक सुरक्षितता प्रदान करण्याची प्राथमिक जबाबदारी राज्याचे आहे.

याचे उदाहरण म्हणजे आर्थिक शैक्षणिक दृष्ट्या विकसित तामिळनाडू राज्यातील महिला अत्याचाराचे प्रमाण संख्या महाराष्ट्र राज्य व इतर दोन्ही राज्यांपेक्षा कमी आहे.आकडेवारीवरून हा निष्कर्ष निघतो की ज्या राज्यात महिला सक्षमीकरणाचे आधार घटक उपलब्ध आहेत. शिक्षण,रोजगार संधी, उत्पन्नाचे साधने, प्रशिक्षण केंद्रे इत्यादी. त्या राज्यात महिला अत्याचाराचे प्रमाण कमी आढळून येते.

**२. विधवा महिला सक्षमीकरणात महाराष्ट्र राज्याचे योगदान**

**विधवा महिला विकास योजनांचा आढावा**

महाराष्ट्र राज्य द्वारे विधवा महिला साठी केंद्र पुरस्कृत योजना राबविण्यात येत आहेत.

- **नोकरी करणाऱ्या विधवा महिलांसाठी वसतीगृहे**

नोकरी करणाऱ्या विधवा घटस्फोटित विभक्त अविवाहित महिलांसाठी सुरक्षित आणि सर्व सोयीयुक्त निवासस्थानाचे निर्मिती राज्य शासनाने केली आहे. या योजनेअंतर्गत मोठ्या शहरात ५० हजार रुपये व इतर ठिकाणी ३५००० पेक्षा कमी मासीक उत्पन्न असलेल्या महिलांसाठी वसतिगृह बांधण्यासाठी किंवा चालवण्यासाठी आर्थिक सहाय्य दिले जाते. या वसतिगृहात के निवासी विधवा महिला किंवा इतर पात्र महिलांना भाडे द्यावे लागतात.

महाराष्ट्र राज्यात २०२१ ला अशी ८१ वसतिगृहे कार्यरत आहेत.

- **स्वाधार**

स्वाधार योजना अंतर्गत विधवा बेघर निराधार तुरुंगातून सुटका झालेल्या महिला कैदी कुंटणखान्यात तून सुटका झालेल्या महिलांचे संरक्षण निवारा संगोपन शिक्षण आणि व्यावसायिक मार्गदर्शन करून पुनर्वसन करण्यात येते.

राज्यात डिसेंबर २०२१ अखेर ३८ स्वाधार गृहे कार्यरत होती. २०१९-२० मध्ये ९९९ महिलांना लाभ देण्यात आला

- **उज्वला**

विधवा किंवा इतर निराधार महिलांवर लैंगिक अत्याचाराच्या घटना राज्यात वाढत असताना त्यावर आळा घालण्यासाठी महाराष्ट्र राज्याने उज्वला योजना ची सुरुवात केली. या योजनेअंतर्गत लैंगिक शोषणासाठी महिलांची तस्करी रोखणे, पीडित महिलांना सुटकेसाठी मदत करणे त्यांना समाजामध्ये पुन्हा सामावून घेणे आणि संरक्षण सुरक्षित निवारा वैद्यकीय मदत कायदेविषयक मदत करणे शिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षण पुरवून त्यांचे पुनर्वसन करणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहेत महाराष्ट्र राज्यात २०२१ अखेर ११ संस्था कार्यरत होत्या. उज्वला योजना अंतर्गत २०१९-२० ला महिलांना लाभ प्राप्त झाला.

- **विधवा महिला सक्षमीकरण**

महाराष्ट्र राज्य महीला आयोग ही एक वैज्ञानिक संस्था आहे. ती नियमितपणे पीडित महिलांच्या तक्रारीवर सुनावणी करते. महिलांना कायदेविषयक सल्ले बस समुपदेशन मोफत पुरविते. एडीत महिलांशी संवाद साधण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्याकरिता महिला आयोग आपल्या दारी या नावाने अभिनव उपक्रम राज्यभर राबविण्यात येत आहेत या उपक्रमा वर २०१९-२० ला ५.६७ कोटी रुपये खर्च झाला आहे.

**निष्कर्ष**

१ मे २०२२ रोजी महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेला ६२ वर्षे पूर्ण होतील. या कालावधीत निराधार विधवा महिलांकरिता विविध क्षेत्रात राज्याने भरीव कामगिरी केली आहे महिला सक्षमीकरणात महाराष्ट्र राज्याचे कामगिरी अन्य राज्यांच्या तुलनेत उल्लेखनीय आहे महिना वर्ग ही एक शक्ती आहे हा दृष्टीकोन बाळगून विधवा महिलांच्या आर्थिक विकासाचा पाया महाराष्ट्र शासनाने घालून दिला आहे.

विधवा महिलांना समाजात हिन दर्जा दिला जातो. विधवांचे सक्षमीकरणात प्रथम त्यांना समजून घेणे, त्यांच्या कार्य कौशल्याला प्राधान्य देणे

आवश्यक आहे.त्यामुळे स्त्रियांमध्ये आत्मविश्वास,आत्मनिर्भरता,सकारात्मकता, स्वावलंबीत्व, निर्णय क्षमता, धाडसी वृत्ती निर्माण होण्यास मदत होईल.

**संदर्भ**

1. Kiran, m.2019), may .918loksatta.chaturang.nagpur.
2. aha, G. o.2010) , March .(1Mahila Din Vishesh. *Lokrajya*, पान .09-11
3. Maharashtra, G. o. .(2020-21) *Maharashtra Economy Survey*. Mumbai: DES.
4. Mavim. .(2016-17) *Tejaswini Maharashtra Rural Women Empowerment Program Annual Progress Report*. Mumbai: Mavim.
5. Mohadhare, S.) March .(2021Mahila Arthik Vikas Mahamandal v Mahila Sakshamikaran. *B.Aadhar*, .136-140
6. Subhash, P.) August .(2019Maharashtratil Mahilanchi Sthiti v Awhane. *Arthsanwad*, .200-207
7. Sumti, K.2019) , July .(13Loksatta. *chaturang* .Nagpur.
8. Tejshwini, M.) July. (2015Maharashtratil Mahila Vikas. Arthasanwad, .152-143

***Cite This Article:***

प्रा. संतोष देविदास मोहधरे *(2022).* **विधवा महिला सक्षमीकरणात महाराष्ट्र राज्याचे योगदान,** ***Electronic International Interdisciplinary Research Journal***, *XI (III) May-June, 236 -239.*